International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.6 July-Aug 2023

# भारतीय स्वातंत्र्यलढ्यात खानदेशातील आदिवासी भिल्ल जमातीच्या योगदानाचे ऐतिहासिक विश्लेषण.

**प्रा. डॉ.डी. एल .पावरा**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग एस .पी. डी. एम कला, वाणिज्य व विज्ञान.महाविद्यालय,
शिरपूर तालुका शिरपूर जिल्हा धुळे .
**Email-** dlpawara2680@gmail.com
**Corresponding Author-** प्रा. डॉ.डी. एल .पावरा
DOI-10.5281/zenodo.8344543

**गोषवारा-**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक देशवासीयांनी,क्रांतिवीरांनी ,संत महात्म्यांनी, महिला ,आदिवासींनी मातृभूमीच्या रक्षणार्थ आपल्या प्राणाची आहुती दिली. यात अनेक देशभक्त फासावर गेले तर काही क्रांतिवीरांनी छातीवर गोळया झेलून आपल्या प्राणाची आहुती दिली .तळागाळातील सर्वसामान्य लोक स्वातंत्र्य व देशभक्तीने भारावलेले होते. या लढ्यात सर्वच समाजातील देशभक्तांनी आपल्या देशासाठी योगदान देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध मोठा संघर्ष करून अगणित लोकांच्या बलिदानाची किंमत मोजल्यावर देशाला स्वातंत्र्य मिळाले .या स्वातंत्र्य लढ्यामध्ये आदिवासी बांधवांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण राहिले होते .त्यांनी स्वतंत्र्य चळवळीमध्ये ब्रिटिशांच्या जमीनदारांच्या तसेच सावकारांच्या अन्याय अत्याचाराविरुद्ध लढा दिला .प्रसंगी आपल्या प्राणाची आहुतीही दिली. मातृभूमी विषयीचे प्रेम सर्वप्रथम आदिवासी जमातींमध्ये दिसून येते .इतिहासाची पाने चाळल्यास या देशाचे मूळ मालक, मूळनिवासी असलेल्या लोकांनी सर्वप्रथम बाह्य आक्रमणाला विरोध केलेला दिसून येतो. ग्रीक आक्रमक अलेक्झांडरला भारतभूमीवर पाय रोवू दिले नाही.लढाऊवृत्ती, लढाऊबाणा हा आदिवासी जमातींमध्ये जन्मताच असल्याने सर्वात अधिक संघर्ष भारतात आदिवासी जमातींना करावा लागलेला दिसून येतो. त्यांच्यात शौर्य व पराक्रम करण्याची क्षमता अधिक असल्याचे आढळते. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात खानदेशातील आदिवासी भिल्लांनी स्वातंत्र्यासाठी प्राण्यांची आहुती दिलेली होती. इतिहासाने त्यांच्या बलिदानाकडे दुर्लक्ष केले असले तरी खानदेशच्या भूमीवर स्वातंत्र्यवीरांची पाऊले उमटलेली आहेत.

## आदिवासी शब्दाची व्युत्पत्ती.

आदिवासी शब्द आदी + वासी हे दोन शब्द मुळात संस्कृत शब्द आहेत.आदि+वासी = आदिवासी हा प्रत्यय लागून आदिवासी शब्द बनला आहे. आदि म्हणजे आधीपासूनचा, पूर्वीचा, मूळचा,प्रथम व वासी म्हणजे वास्तव्य करत असलेले. जो मूळचा राहणारा तो आदिवासी .आदिवासी हा शब्द मूलनिवासी, ओरिजिनल या इंग्रजी शब्दापासून तयार झालेला आहे. सर्व प्रथम इसवी सन 1830 मध्ये ऑस्ट्रेलिया देशात आदिवासी हा शब्द वापरला गेला .भारतात इसवी सन 1871 मध्ये पहिल्या जनगणनेच्या अहवालात आदिवासी शब्दाचा उल्लेख आढळतो .सन 1880 मध्ये गॅजेटर्स ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी खंड 12 च्या खानदेश गॅझेट मध्ये पान नंबर 151 वर आदिवासी या शब्दाचा उल्लेख आहे तर सन 1886 च्या द इम्पेरियल ऑफ इंडिया खंड सातच्या इंदोर गॅजेटमध्ये पान नंबर 03 वर आदिवासी या शब्दाचा उल्लेख सापडतो .भारताच्या दुसऱ्या जनगणनेत सण 1891 च्या अहवालात Forest tribe म्हणून आदिवासींचा उल्लेख केलेला आहे पुढे सन 1901 व 1911 या वर्षाच्या जनगणना अहवालात आदिवासी जमातींसाठी एनीमिस्ट म्हणजेच मूळनिवासी ,मूळ रहिवासी म्हणून उल्लेख आढळतो .सन १९२१ मध्ये प्रीमेटिव्ह हा शब्द ब्रिटिशांनी भारतातील आदिवासींच्या स्वतंत्र धर्म या विभागात वापरला तर 1931 च्या जनगणना अहवालात ट्रायबल रिलीजन म्हणजे आदिवासी

धर्म पालक लोक असा केलेला आढळतो पुढे 1941 च्या ब्रिटिश जनगणना अहवालामध्ये ट्रॅव्हल्स म्हणजे जमाती हा शब्द आदिवासींसाठी उल्लेख केलेला आढळतो. टोळी करून राहणारी जमात म्हणून भारतीय राज्यघटनेत आदिवासींचा उल्लेख अनुसूचित जमाती म्हणून करण्यात आलेला आहे. सन 1950 मध्ये भारतीय राज्यघटनेत कलम 342 एक अन्वये 645 आदिवासी जमातींचा भारतीय मूळनिवासी ,स्वदेशीलोक म्हणून समाविष्ट करण्यात आले होते. या सूचीतील संख्येने गोंड ही भारतातील सर्वात मोठी आदिवासी जमात असून दुसऱ्या क्रमांकावर भिल्ल या जमातीची लोकसंख्या आहे. खानदेशात भिल्ल जमातीचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आढळते.

**भिल्ल या शब्दाचे व्युत्पत्ती-**

बिल भिल्ल हा शब्द द्राविडीयन भाषेतून आलेला आहे प्राचीन तामिळ कवींनी धनुष्यबाण धारण करणाऱ्याला विलूवर हा शब्दप्रयोग केला या आधारे विल्लू किंवा बिल्लू म्हणजे धनुष्यबाण बाळगणारा तो बिल भिल्ल.हा शब्द इ.स.पूर्व 600 मध्ये प्रथमच उच्चार केलेला शब्द असून सन 1880 च्या गॅजेट नुसार खानदेश हे तेथिस काळातील पिग्मी होते असा उल्लेख आढळतो. प्रसिद्ध भूगोलतज्ञ टॉलेमी यांनी इसवी सन 150 मध्ये पुलींद आणि फिलिप्ट या जमातींचा उल्लेख केलेला आहे. या जमातीचे वास्तव्य सातपुडा व विंध्य पर्वतात असल्याचा उल्लेख त्यांच्या ग्रंथात आढळतो. पुलिंद म्हणजे भिल्ल व फिलिप्त म्हणजे गोंड या दोन्ही जमातींचे वास्तव्य आजही या पर्वत शृंखलांमध्ये आहेत. रामायण व महाभारत या महाकाव्यात भिल्लांचा उल्लेख केलेला आढळतो. भिल्लांसाठी त्यांनी किरात ,पुलिंद, चांडाळ, सबर,असुर ,इत्यादी शब्दाचा प्रयोग केलेला होता. संस्कृत साहित्यातील गुणांच्या कथासरीत सागर ग्रंथात पान नंबर २०० वर भिल्लांचा उल्लेख केलेला आढळतो .इसवीसन 600 च्या शतकात भारतात आदिवासी भिल्लांचे राज्य होते. खान्देश गॅझेट मधील नोंदीनुसार डॉ. वेबरच्या मतानुसार सहाव्या शतकात भिल्लराजे असल्याचा उल्लेख केलेला असून हत्तीवर बसलेल्या भिल्ल सरदार असा उल्लेख पान नंबर १५२ आढळतो .महाकाव्यकाळात एकलव्य ,शबरी भिल्ल, दशग्रीव ,मेघनाथ इत्यादी पात्रे भिल्लांचीच होती. एकंदरीत भिल्ल ही अतिप्राचीन आदिवासी जमात होती. भिल्लांचा ऐतिहासिक काळ वैभवचा होता मात्र इंग्रजी सत्तेनंतर त्यांचा काळ खडतर झालेला दिसून येतो.इंग्रजी सत्तेविरुद्ध त्यांना वारंवार लढावे लागले होते ब्रिटिश सत्तेला हाताशी धरून भिल्ल प्रदेशात शेठ, सावकार, व्यापारी, वनाधिकारी, पोलीस प्रशासन, जामीनदारांनी मुक्त प्रवेश केला व पुढे भिल्लांचे त्यांनी अतोनात शोषण केले.

शोध निबंधात भारतीय स्वातंत्र्य लढ्यात खानदेशातील आदिवासी भिल्ल क्रांतिकारक स्वातंत्र सैनिकांच्या कार्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे सदर शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापराबरोबर प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे तसेच तत्कालीन वृत्तपत्रे ,मासिके ,गॅझेटर्स, स्मरणिका आणि इतर दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**खानदेशातील जंगल सत्याग्रह 1927**

आदिवासी जमातींचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन जंगल होते .जसे लहान मुल आईच्या दुधावर अवलंबून असते त्याचप्रमाणे आदिवासींचे जीवन जंगलावर अवलंबून होते. ब्रिटिशांनी सन १९२७ मध्ये वन कायदा केला .या कायद्यानुसार आदिवासींना जंगलातून लाकूड, सरपण, डिंक, मध ,गवत पाने, मोहूफुले ,विविध फुले, कंदमुळे इत्यादी तोडण्यास व आणण्यास बंदी घालण्यात आली. यामुळे खानदेशातील आदिवासी भिल्लांनी जंगल सत्याग्रह केला. गावातील हक्काची जंगलावरील लाकडे तोडण्यास ब्रिटिशांनी विरोध केल्यामुळे खानदेशातील आदिवासी भिल्ल काठ्या, कोयते ,कुऱ्हाड ,विडा इत्यादी लाकडी लोखंडी तीरकामठा ,गोफण, हातात घेऊन ब्रिटिशांचा जंगल कायदा मोडून आंदोलन केले .यासाठी लोक घरातून रस्त्यावर आले होते .हिंसक मार्गाचा त्यांनी अवलंब केला होता. अशावेळी महात्मा गांधींनी देशभर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली होती .त्या चळवळीला पाठिंबा देत खानदेशातील भिल्ल आदिवासी आपल्या जीवाची पर्वा न करता महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला. तत्पूर्वी बारा वर्षांपूर्वी अहमदनगर जिल्ह्यात भिल्ल क्रांतिकारक तुळशीराम यांनी अकोले तालुक्यात दोन हजार कोळी बिल्लांसह १० ऑगस्ट १९१८ रोजी भर बाजारात एका ब्रिटिश हवालदाराला ठार मारले होते त्यांचे नेतृत्व करणाऱ्या तुळशीराम भिल यास फाशीची शिक्षा दिली होती. त्याचा बदला घेण्यासाठी खानदेशातील भिल्ल

आतुरतेने वाट पाहत होते आणि ती संधी त्यांना 1930 मध्ये सविनय कायदेभंग चळवळीच्या निमित्ताने मिळाली.

**खानदेशातील सविनय कायदेभंग चळवळ 1930**

लाहोर ठरावानुसार गांधीजींच्या नेतृत्वाखाली 14 फेब्रुवारी 1930 रोजी सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्यात आली. हिंसा न करता ब्रिटिशांचे जुलमी कायदे मोडणे आणि त्या संदर्भात शिक्षा भोगणे म्हणजे सविनय कायदेभंग होय .गांधीजींच्या या कायदेभंगाला संपूर्ण भारतातून पाठिंबा मिळाला होता जिथे समुद्रकिनारा आहे तिथे लोकांनी मिठाचा सत्याग्रह केला तर जिथे समुद्रकिनारा नाही तेथे साराबंदी किंवा जंगल सत्याग्रह कोंडवाडा मुक्ती आंदोलन, सभा ,मिरवणुका इत्यादी मार्गांचा अवलंब सुरू केला .या आंदोलनात खानदेशातील भिल्लानी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता. या आंदोलन करताना अटक करून कडक शिक्षा ठोकल्या होत्या. सन 1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीतील पुढील आदिवासी भिल्लांनी सहभाग घेतल्यामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते.

**भिल शामभाऊ उखा-** यांचे जन्मगाव महसदी तालुका साक्री जिल्हा धुळे. येथे सन १९३० सालच्या कायदेभंगाच्या आंदोलनात सहभाग घेतला, जंगल सत्याग्रह केला व कोंढवाडा मुक्ती आंदोलनात भाग घेतला म्हणून दोन महिने सक्तमजुरीचे शिक्षा व २५ रुपये दंड ठोठावण्यात आला. सन 1891 मध्ये म्हसदी गावात जन्मलेले श्यामभाऊ उखा भिल यांचे सन 1950 साली निधन झाले.

**भिल हिराजी रामा-** यांचे मूडगाव भाटपुरा तालुका शिरपूर जिल्हा धुळे शिरपूर तालुक्यात १९३० सालच्या कायदेभंगाच्या आंदोलनात सहभाग घेतला. सभा मिरवणुकीत आणि जंगल सत्याग्रहात भाग घेतला म्हणून त्यांना ब्रिटिशांनी चार महिने सक्तमजुरीची शिक्षा दिली होती या स्वातंत्र्यसैनिकाचे सन 1965 साली निधन झाले.

**भिल पुंजू धनाजी-** सन 1908 मध्ये शहादा तालुक्यातील कर्जत गावात त्यांचा जन्म झाला. अवघ्या वयाच्या 22 व्या वर्षी त्यांनी सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला होता शहादा शहरात झालेल्या सभा व मिरवणुकीत सहभाग घेतला म्हणून ब्रिटिशांनी त्यांना तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा सुनावली होती.

**भिल मंडा जुगा** सन १९११ मध्ये जन्मलेले विखरण तालुका शिरपूर येथील रहिवासी मंडा भिल यांनी सन 1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीत व जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला म्हणून तुरुंगात डाबण्यात आले होते. त्यांना साध्या कैद्याची शिक्षा सुनावली होती मात्र तुरुंगात पोलिसांकडून अमानुषपणे मारहाण करण्यात आली .पुढे दोन महिन्यांनी त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली.

**भिल धर्मा दादाजी** सन 1907 मध्ये टेंबे तालुका बागलाण जिल्हा नाशिक येथे त्यांचा जन्म झाला. नाशिक जिल्ह्यात मीठ सत्याग्रह चळवळीत भाग घेतला म्हणून ब्रिटिशांनी त्यांना अठरा महिन्यांची शिक्षा सुनावली होती. तुरुंगात असताना पोलिसांनी मारहाण केली तथा दीड वर्ष सक्तमजुरीची ही शिक्षा भोगावे लागली होती.

**भिल महादू डोंगर** यांचे मूडगाव नांदणी तालुका बागलाण जिल्हा नाशिक होते सन 1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला होता जंगल सत्याग्रह करून त्यांनी ब्रिटिशांविरोधी साराबंदी आंदोलन केले कर भरण्यास नकार दिला म्हणून ब्रिटिश सरकारने पाचशे रुपये दंड ठोठावला होता महादेव भिल यांनी दंड भरला नाही म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांच्या मेंढ्या जप्त केल्याचा उल्लेख आढळतो . ब्रिटिश सरकारने चळवळ मोडून काढण्यासाठी लाठीमार, कैद, दंड, सक्तमूजुरी, तुरुंगात मारहाण ,शिक्षा इत्यादी मार्गाचा अवलंब केला होता .खानदेशातील आदिवासी भिल्ल तरुण मोठ्या प्रमाणावर जंगल सत्याग्रहात सहभागी झाले होते. 4 मे 1934 रोजी ब्रिटिशांनी महात्मा गांधीजींना अटक केल्यामुळे सविनय कायदेभंग चळवळ बंद करण्यात आली त्याऐवजी वैयक्तिक सत्याग्रह सुरू करण्यात आला. पुढे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात गांधीजींनी ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी चले जाव चळवळीची सुरुवात केली .या चळवळीत देखील खानदेशातील आदिवासी भिल्लांनी भाग घेतला होता.

**खानदेशातील चले जाव चळवळ**

जग दुसऱ्या महायुद्धात गुंतलेले होते. ब्रिटिशांना भारतातूनही मोठ्या प्रमाणावर विरोध केला जात होता सुभाष चंद्र बोस यांची आक्रमक लष्कर कारवाई सुरू केली होती. अशावेळी महात्मा गांधीजींनी 8 ऑगस्ट 1942 रोजी चले जाव चळवळ सुरू केली. ब्रिटिशांनी ताबडतोब भारत सोडून जावे अशी मागणी जोर धरू लागली होती. याचे पडसाद खानदेशी भूमीवर देखील पडले. 9 ऑगस्ट

यादिवशीखानदेशात मोठ्या प्रमाणावर स्त्रिया, शाळकरी विद्यार्थी ,नोकरवर्ग ,दलित -आदिवासी कामगार ,इत्यादींनी या चळवळीत भाग घेतला होता. भिल्ल जमातीतील क्रांतिकारक ही या चळवळीत सहभागी झाले होते .करेंगे या मरेंगे या निर्दाराने लढा दिला. रेल्वे लुटणे, सरकारी तिजोरी लुटणे, सरकारी मालमत्ता पेटवून देणे, सापडतील त्या इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करणे, वाहतुकीची साधने बंद पाडणे, इत्यादी कार्यांना ऊत आला होता. खानदेशात मोठ्या प्रमाणावर जाड पोळीची ,लुटालुट करण्यात आली होती.

जळगाव जिल्ह्यात **भिल संपत राजू** यांनी चले जाव चळवळीत भाग घेतला होता. त्यांनी खादी ग्राम उद्योगाचे विधायक कार्यात भाग घेऊन स्वदेशीचा पुरस्कार केला होता. भजन कीर्तन आणि पोवाड्याचे मार्ग प्रचार कार्यात भाग घेतला होता .त्यांचे मूळ जन्मगाव कंडारी होते. भूमिगत आंदोलकांना आश्रय व सहाय्य मदत केली होती म्हणून त्यांना अटक करण्यात आली. त्याचबरोबर चहाडी येथील **भिल सिताराम काढू** यांनी चोपडा शहरात चले जाव चळवळीत भाग घेतला होता. सभा व मिरवणुकीत सहभाग घेतला म्हणून त्यांना धरणगावच्या न्यायालयात सहा महिने फक्त मजुरीचे शिक्षा झाली तसेच चोपडा तालुक्यातील अकुल खेडे येथील रहिवासी असलेले **भिल ताराचंद राजाराम** यांना चले जाव चळवळीत भाग घेतल्याबद्दल चार महिन्यांची शिक्षा झाली होती. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात १९२६ साली जन्मलेले **गावित गोकुळ रूपा** यांना चले जाव चळवळीत सहभाग घेतल्याबद्दल तसेच ते काँग्रेसचे कार्यकर्ते आहेत म्हणून अटक करण्यात आली होती. तसेच महिर येथील **भिल आनंदा कौतिक** राहणार साक्री यांना 1942 सालच्या चळवळीत भूमिगत आंदोलनाचे कार्यकर्त्यांना सहाय्य व आश्रय दिला त्याबद्दल त्यांना तीन आठवडे पोलीस कोठडीत ठेवण्यात आले होते. पोलीस कोठडीत पोलिसांकडून जबर मारहाण करण्यात आली होती. शिरपूर येथील **भिल गुलचंद तानकू** यांना बेकायदा मिरवणूक काढली म्हणून त्यांना एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली तसेच विखरण तालुका शिरपूर येथील 1913 साली जन्मलेले **भिल डोंगर जुगा** यांना चले जाव 1942 सालच्या चळवळीत सभा मिरवणुकीत भाग घेतला तसेच भूमिगत आंदोलकांना सहाय्य व आश्रय दिला म्हणून तुरुंगात डांबण्यात आले होते.शिंदखेडा तालुक्यातील **भिल दगा तापीराम** यांना 1942 सालच्या बेकायदा मिरवणुकीत भाग घेतला म्हणून त्यांना आठ महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. 1945 साली ते पोलिसांच्या लाठी मारात मरण पावले .धुळे जिल्ह्यातील बोरकुंड येथे सन १९१७ साली जन्मलेले **भिल दलवत भुदा** यांना चलेजावच्या चळवळीत सहभाग भूमिगत कार्यकर्त्यांना आश्रय दिला म्हणून तुरुंगात टाकण्यात आले होते सन 1920 साली जन्मलेले **भिल दीपचंद काळुसिंग** हे गोरणे तालुका शिंदखेडा येथील रहिवासी होते. त्यांचे तिसरी इयत्तेपर्यंत शिक्षण झालेले होते. 1942 सालच्या चले जाव चळवळीत सभा मिरवणुकीत भाग घेतला भूमिगत आंदोलकांच्या कार्यकर्त्यांना सहाय्य व मदत आश्रय दिला, शासकीय मालमत्तेच्या विद्वंसक कार्यात भाग घेतला म्हणून त्यांना ब्रिटिशांनी चार महिने सक्तमजुरीची शिक्षा दिली होती .भारत स्वतंत्र झाल्यावर त्यांचा शासनाकडून सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला होता. त्यांच्यासोबत असलेले गोराणे गावातील रहिवासी **भिल दीपा भायसिंग** यांचे 1942 सालच्या चले जाव चळवळीत सरकार विरोधी प्रचार केला म्हणून त्यांना चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाल्याचा उल्लेख आढळतो.

साक्री तालुक्यातील आदिवासी भील्लांनी चलेजाव चळवळीत सहभाग घेतल्याचा उल्लेख स्वातंत्र्यसैनिक कोशात आढळतो .मजदी तालुका साक्री जिल्हा धुळे येथील आदिवासी कार्यकर्ते **भिल पांडू गणपत** यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. त्यांच्यासोबत **भिल वनजी धनजी** राहणार महिर तालुका साक्री हे होते. या चळवळीत भूमिगत आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना मदत व आश्रय दिला होता .त्यांना त्याबद्दल तीन आठवडे पोलीस कोठडी सुनावली गेली होती. पोलिसांकडून अमानुषपणे मारहाण करण्यात आल्याचा उल्लेख खानदेशातील स्वातंत्र्यसैनिक कोशात आढळतो. शिंदखेडा तालुक्यातील दलवाडे येथील **भिल मनका बारका** यांनी 1942 सालच्या चले जाव चळवळीत भूमिगत राहून कार्य केले सरकारी मालमत्तेचा विध्वंस केला तसेच कमर खेडे येथील शेतसारा लुटीच्या कार्यात सहभाग घेतला म्हणून त्यांना सात वर्ष सक्तमुजेरीची शिक्षा झाली. या आंदोलनाच्या क्रांतिकारकांपैकी सर्वात जास्त शिक्षा भोगलेले ते पहिली व्यक्ती म्हणजे होती. डांगुर्डे तालुका शिंदखेडा येथील रहिवासी **भिल रामदास दौलत** यांना चलेजाव चळवळीत भूमिगत आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना मदत व आपल्या घरात

आश्रय दिला म्हणून तसेच शासकीय मालमत्तेच्या विध्वंसक कार्यास भाग घेतला त्याबद्दल 1944 साली अटक झाली. त्यांना दोन महिन्याची शिक्षा ठोकवण्यात आली होती. तसेच बोरकुंड येथील **भिल मंगर मानकू** राहणार धुळे यांना भूमिगत कार्य आंदोलकांना कार्यकर्त्यांना आपल्या घरात आश्रय व मदत केली म्हणून तीन महिन्याची शिक्षा सुनावली होती.

या काळात देशभर चले जाव चळवळीचे तीव्र पडसाद उमटले होते. दरम्यान या आंदोलनामुळे देशात 500 पोस्ट ऑफिसस, 250 रेल्वे स्टेशन्स, 150 पोलीस चौकी नष्ट केल्या 31 पोलीस व 11 शिपाई ठार झाले .सरकारने 588 वेळा गोळीबार केला. त्यात 930 माणसे ठार व 1630 जखमी झाली होती. 60,329 लोकांना सरकारने तुरुंगात डांबले होते .26000 लोकांना शिक्षा ठोकण्यात आल्या होत्या .खानदेशात 25 भिल्ल आदिवासी क्रांतिकारकांनी चलेजाव चळवळीत भाग घेतल्याचे दिसून येते. यापैकी फक्त स्वातंत्र्यसैनिकांचे 4 वारस जिवंत आहेत. **भिल पार्वताबाई सुरमल** राहणार डिव्हिजन ऑफिस धुळे आणि **भिल रेश्माबाई दुला** राहणार होरपाडे पोस्ट.भोरकुंड जिल्हा धुळे व **भिल गुलचंद तांकु** राहणार शिरपूर आणि **भिल दीपचंद काळूसिंग** राहणार गोराणे यांच्या वारसांना सध्या शासनातर्फे पेन्शन दिले जात आहे.

**संदर्भ साधने**

1. सेन्सेक्स ब्रिटिश सरकार १८७१

2. गॅजेटिअर्स ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी खंड 12 खानदेश १८८०

3 .द इम्पेरियल ऑफ इंडिया खंड सात इंदोर 1886

4. सिमकॉक्स, ए.एच.ए.1912 खानदेश भिल क्रॉप्स मुंबई

5 .कुंटे, भ, ग, संपा. 1979 स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश महाराष्ट्र राज्य पश्चिम खानदेश खंड 1 सचिव दर्शनीका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई

6. धुळे जिल्हा स्वातंत्र्यसैनिक वारस पत्नी यांची यादी 16 मार्च 2018 रजिस्टर नंबर एक व दोन

7. कदम, य.ना.-2003 समग्र भारताचा इतिहास फडके प्रकाशन कोल्हापूर.

8. शहा, जी बी.व पाटील,बी.एन.2014 भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन जळगाव.